MHJN020005472013

नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३
निलावती व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020005472013

## निशाणी क्रमांक १३५ वरील आदेश

सदरचा अर्ज वादींतर्फे महत्वाचे कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

वादींतर्फे सदरच्या दाव्यात महत्वाचे कागदपत्र सादर केले आहे . सदर कागदपत्र दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदर कागदपत्र दाखल करण्याची परवानगी वादींतर्फे मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादींतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने प्रतिवादींनी नाकारली आहेत. त्यानुसार खरेदीदार दाव्यात पक्षकार नाही. त्यामुळे सदर दस्त वाचता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) वादीं व प्रतिवादींतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तिवाद ऐकला . कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादींतर्फे महत्वाचे कागदपत्र सादर केले आहे. सदर कागदपत्र दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे वादींनी नमूद केले आहे. प्रतिवादींतर्फे अर्जास विरोध दर्शविताना खरेदीदार दाव्यात पक्षकार नाही. त्यामुळे सदर दस्त वाचता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

६) वादींतर्फे सादर केलेल्या कागदपत्रांचे स्वरुप विचारात घेता खरेदीखताची मुळ प्रत सादर केली आहे. सदर दस्त सार्वजनिक दस्त नाही. त्यामुळे सदर कागदपत्र दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. या करिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज निशाणी क्र.१३५ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२) परिणामतः वर्णन यादी निशाणी क्र.१३६ नुसार सादर केलेले कागदपत्र दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NANDKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2024.04.02 17:45:14 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः ०२/०४/२०२४

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना

दिनांक : ०२/०४/२०२४

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक ग्रेड–३